# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-13.04.2026** **वार- सोमवार**

---

**नारीशक्ती संमेलन**

महिलांचे परिश्रम, धैर्य आणि आत्मविश्वासाच्या बळावर भारतातील नारीशक्तीनं नवी उंची गाठली आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत नारीशक्ती वंदन संमेलनात बोलत होते. महिला सक्षमीकरणाच्या दिशेनं संसदेत लवकरच एक ऐतिहासिक निर्णय घेतला जाणार असून त्याद्वारे संसदेत महिलांना आरक्षण दिलं जाणार आहे असं पंतप्रधानांनी सांगितलं.

**अंत्यसंस्कार**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या पार्थिवावर आज मुंबईत बंदूकीच्या २१ फैरींची मानवंदना देऊन शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, अन्य मंत्री यांच्यासह चित्रपट आणि संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी आशाताईंच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करुन श्रद्धांजली वाहिली.

**भरती**

शासनाच्या विविध पदांवरील भरती प्रक्रिया सुटसुटीत, सक्षम आणि उमेदवारांच्या दृष्टीने सुलभ व्हावी, याकरता पदभरती प्रक्रियेत सुधारणा करण्याला आज मंत्रिमंडळानं मान्यता दिली. या सुधारणेमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या संवर्गांची संख्या १०२ होणार आहे. तर संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्याने १८ सेवांचा आणि ९३ संवर्गांचा समावेश होईल. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्यात निपुण सेतू पोर्टल सुरू करण्यालाही आजच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**आंबेडकर जयंती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पुण्यातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीनं उद्या सकाळी साडेनऊ वाजता संयुक्त अभिवादन सोहळा आयोजित केला आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, यांच्यासह पुण्यातील सर्व खासदार, आमदार, वरीष्ठ शासकीय अधिकारी आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. पुणे शहर आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येनं उपस्थित राहून महामानवाला अभिवादन करावं, असं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

**गांधीदर्शन शिबीर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काल कोथरुडमधल्या गांधी भवन इथं महात्मा जोतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानावर विशेष व्याख्यानांचं आयोजन करण्यात आलं होतं. गांधी विचार दर्शन मालिकेतील या ३०व्या पुष्पात सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या महात्मा फुले अध्यासन केंद्राचे विश्वनाथ शिंदे, मराठी भाषा सल्लागार समितीचे सदस्य, प्राध्यापक प्रा. पी. विठ्ठल आणि युवा भारत आंदोलनचे सल्लागार शशी सोनावणे यांनी आपले विचार मांडले.

**बालचित्रपट महोत्सव**

संवाद संस्थेतर्फे पुण्यात येत्या १७ ते २३ एप्रिल दरम्यान बालचित्रपट महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात कोथरुडमधील सिटी प्राईड चित्रपटगृहात दररोज सकाळी साडेनऊ वाजता चित्रपट दाखवले जाणार आहेत. या महोत्सवासाठीच्या मोफत प्रवेशिका चित्रपटगृहात सकाळी ९ ते ११ या वेळेत मिळतील असं आयोजकांनी कळवलं आहे.

**पुरस्कार**

पुण्यातील आर्ट बिटस फाउंडेशनचा कला गौरव पुरस्कार यावर्षी युवा तबला वादक अविनाश पाटील यांना जाहीर झाला आहे. संगीत क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या युवा कलावंताला संस्थेतर्फे दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो.

**पाणीपुरवठा**

पुणे महापालिकेच्या विविध जलशुद्धीकरण केंद्रांमधील दुरुस्तीच्या कामांमुळे येत्या गुरुवारी संपूर्ण शहरातील पाणीपुरवठा बंद राहणार आहे. शुक्रवारी सकाळी उशीरा कमी दाबाने पाणीपुरवठा केला जाईल असं पाणीपुरवठा विभागानं कळवलं आहे.

**रॉकेल पुरवठा**

गॅस सिलिंडरच्या तुटवड्यामुळे शिधा पत्रिकेवरुन रॉकेल देण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात केवळ अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना प्रतिलिटर ६२ रुपये दरानं रॉकेल उपलब्ध करुन दिलं जाणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी दिली.

**निधन**

पुणे श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश भोईटे यांचं आज प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते साठ वर्षांचे होते.

भोईटे यांनी पुढारी, देशदूत, पुण्यनगरी, देशोन्नती या वृत्तपत्रांमध्ये प्रदीर्घकाळ वार्तांकन केलं. सध्या ते दैनिक केसरीमध्ये कार्यरत होते. त्यांच्या पार्थिवावर आज रात्री नऊ वाजता पुरंदर तालुक्यातील कोथळे या गावात अंत्यसंस्कार केले जातील.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्या आकास निरभ्र असेल आणि कमाल तापमानात किंचित वाढ होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू, संध्याकाळी सहा वाजता विविध भारती पुणे केंद्रावर ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**